# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

।। सामान्य प्रशासन विभाग।।


जा.क्र.मनपा/सा.प्र./ ८६ /२०२२ - २३ दि. ३१ /०५ /२०२२

## //परिपत्रक//

महाराष्ट्र शासन अधिनियम 1964 अन्वये महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागिरी लिपीतील मराठी भाषेचा अंगीकार करण्यात आला आहे. प्रशासकीय कामकाजातील मराठी भाषेच्या वापराची प्रयोजन निश्चित करण्यासाठी आणि जनसंवाद व जनहीताशी संबधित बाबींमध्ये शासकीय कार्यालयांकडून मराठी भाषेचा वापर करण्यात यावा यासाठी "महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, 2021" दि.16/07/2021 रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे.

तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात मराठी भाषेच्या वापराची प्रयोजने निश्चित करून जनसंवाद व जनहीताशी संबंधित बाबींमध्ये मराठी भाषेचा वापर होण्यासाठी "महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम,2022" दि.07/04/2022 रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी संदर्भिय शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांचे पालन करुन आपल्या कामकाजात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर होईल या बाबत दक्षता घ्यावी.

(मारूती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका